प्रास्ताविक

मानव आणि पर्यावरण यांचा अभिन्न संबंध आहे. पर्यावरण जीव व प्रजाती यांचा जीवन विकास आणि मृत्यू या सर्वांना प्रभावित करते. मानव आणि निसर्ग यांच्या अन्योन्य संबंधातून संस्कृती निर्माण होते.साहित्य हा या संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे. मानव आणि निसर्ग यांच्यातील क्रिया प्रतिक्रियांचा प्रभाव साहित्यामध्ये उमटतो.निसर्गातील या बदलांना मानवच कारणीभूत असल्याने निसर्ग व पर्यावरणावर परिणाम होतो. त्यामुळे पर्यावरण समतोल राहतो अथवा विषमता निर्माण होते.प्राचीन काळापासून पर्यावरणीय सभ्यतेचा मानव विचार करत आलेला आहे. दूषित पर्यावरणाचा प्रश्न त्यांने आपल्या अभिव्यक्तीतून मांडला आहे. मध्ययुगामध्ये जसा पर्यावरणाच्या विषयी विचार पुढे आला आणि त्यातून नैसर्गिक विज्ञान विकास पावले.आजच्या काळात विज्ञान युगात पर्यावरणाच्या समतोलतेकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे.आपण आपली सभ्यता विसरून आपल्या स्वार्थासाठी पर्यावरण प्रदूषित करत आहोत. निर्सगाचा हवा तसा वापर करत आहोत,निसर्गातील स्त्रोतांचा जात ,वर्ग,लिंगभाव यांच्या विभागणीमध्ये विषमता आणून नैसर्गिक व सांस्कृतिक पर्यावरण जटील केले जात आहे. ही गोष्ट आपल्या सर्वांसाठी चिंतेची आहे. भारतीय साहित्यातच नव्हे तर मराठी साहित्यातही पर्यावरण रक्षण, पर्यावरण चित्रण, दुष्परिणाम या सर्वांचे चित्रण आले आहे.

भारतीय चिंतन आणि साहित्य यांचा अभ्यास करता आपणास असे दिसते की मानव जातीचा इतिहास जितका प्राचीन आहे तितकाच पर्यावरण चित्रणाचा इतिहासही प्राचीन आहे. लोकायत,बुध्दपरंपरा ,वेद, उपनिषद, पुराण, महाभारत, रामायण यातूनही पर्यावरणाचे महत्त्व वर्णन केले आहे. पर्यावरणाचे संतुलन फक्त मानव जातीसाठीच नव्हे तर पृथ्वीवर असणाऱ्या संपूर्ण जीवनसृष्टीसाठी त्यांचे अस्तित्व राखण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. जागतिक तापमान वाढ ही पर्यावरण प्रदूषणाचे भयावह आणि विनाशकारी रूप म्हणून येताना दिसत आहे. वाढते औद्योगीकरण त्यातून निघणारी घातक रासायनिक विषद्रव्ये मानवी जीवनाच्या मुळावर उठली आहेत. पर्यावरणाच्या असमतोलामुळे मानवी समाजासमोर अत्यंत महत्त्वाचे प्रश्न निर्माण झाले आहेत.

पर्यावरण प्रदूषणाचा प्रभाव व्यक्तींच्या शारीरिक, मानसिक आणि बौदिधक विकास यावर पडतो.प्रस्तुत संशोधनामध्ये मराठी कवितेची पर्यावरणवादी समीक्षा केली जाणार आहे.

अभ्यासविषय निवडीमागील उद्देश

I- साहित्यप्रकार म्हणून कवितेतील निसर्ग व पर्यावरणाचा अभ्यास करणे.

II- कवितेतील पर्यावरणाचे विषमतावादी वाटप व निसर्गाची भूमिका अभ्यासणे.

PDF created with pdfFactory trial version www.pdffactory.com

III- पर्यावरण व मानव यांच्या सहसंबंधाचे चित्रण कवितेतून कशा प्रकारे आले आहे त्याचा अभ्यास करणे.

IV- स्त्रीवाद आणि पर्यावरण यांच्या सहसंबंधाचा अभ्यास करणे व साहित्यातून त्याचे चित्रण कशा प्रकारे आले आहे त्याचा स्त्रीवादी दृष्टिकोणातून आढावा घेणे.

V- संस्कृती संकर व पर्यावरण यांच्या सहसंबंधाचा अभ्यास करणे.

VI- वर्ग,वंश,जात,लिंगभाव, धर्म यानुसार बदलत्या निसर्गचित्रणाचा व निसर्गप्रतिमांचा अभ्यास करणे.

VII- भौगोलिक व सामाजिकदृष्टया साहित्यातील पैलूंचे विवेचन करणे.

गृहितके (Hypothesis½

ए स्वातंत्र्योत्तर मराठी कवितांमधून निसर्गाचा व त्यातील प्रतिमा, प्रतिकांचा वापर खूप मोठया प्रमाणावर झाला आहे.

एए. पर्यावरण निसर्ग व स्त्री यांचा जवळचा सहसंबंध आहे व त्याचा विचार पर्यावरणीय स्त्रीवादी दृष्टिकोणातून केला गेला

आहे.

एएए. निसर्ग व सांस्कृतिक पर्यावरण,भाषिक पर्यावरण,सामाजिक पर्यावरण,आर्थिक पर्यावरण यांच्या निकटच्या संबंधाचे चित्रण

मराठी कवितेतून मोठया प्रमाणावर आले आहे.

एट. विविध विद्याशाखा आणि निसर्ग ,पर्यावरण व मानवी जीवन यांचा घनिष्ठ संबंध आहे.

ट दृमानवनिर्मित पर्यावरण वाटपाची जात,वर्ग,लिंगभाव,धर्माधिष्ठित विषमता साहित्यातून विशेषत: कवितेतून दिसते.

संशोधनाच्या पध्दती

स्वातंत्र्योत्तर ते २०१५ पर्यंतच्या मराठी कवितेची पर्यावरणवादी समीक्षा या संशोधनविषयासाठी सैध्दांतिक संशोधन पध्दती,अन्वयार्थक संशोधन पध्दती,संदर्भान्वयी संशोधन पध्दती ,तौलनिक,मानसशास्त्रीय अशा विविध संशोधन पध्दतींचा अवलंब केला जाणार आहे.

साहित्याचे पुनरावलोकन व महत्त्व (Review of literature½

प्रस्तुत शोधप्रबंधाच्या दृष्टीने अभ्यास करताना आपणास असे दिसून येते की, मराठी साहित्यातील कविता हा वाङ्मयप्रकार खूप अभ्यासला गेला आहे. कवितेतील निसर्ग चित्रणाचा अभ्यासही काही कवींच्या कवितासंग्रहांच्या अनुषंगाने झाला आहे. मराठी साहित्य समीक्षेमध्ये मराठी

PDF created with pdfFactory trial version www.pdffactory.com

कवितेची पर्यावरणवादी समीक्षा या अनुषंगाने काही अभ्यास झाले आहेत.पर्यावरणीय स्त्रीवाद,सांस्कृतिक,राजकीय,आर्थिक,सामाजिक पर्यावरण,भाषिक पर्यावरण या अनुषंगानेही काही पुस्तके लिहिली गेली आहेत.मराठीमध्ये शरद पाटील,रा.ग.जाधव,भारत पाटणकर,कुमार शिराळकर,वंदना भागवत,अश्विनी धोंगडे या अभ्यासकांनी या अनुषंगाने लेखन केले आहे.राजन गवस यांनी कृषिजनसंस्कृती ही पर्यावरणवादाला जवळ जाणारी संकल्पना मांडली आहे.दलित आदिवासी व परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्त्यांनी पर्यावरणाचा समताधिष्ठित अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे.या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधन मराठी साहित्याची पर्यावरणवादी समीक्षा व त्या अनुषंगाने मराठी कवितेची पर्यावरणवादी समीक्षा हा अभ्यासविषय खूपच उद्बोधक ठरेल यात शंका नाही.

आंतरविद्याशाखीय संबंध

मराठी कवितेची पर्यावरणवादी समीक्षा हा अभ्यासविषय सर्व अभ्यासशाखांशी अगदी जवळचा आहे. भूगोल,पर्यावरणशास्त्र,समाजशास्त्र,राज्यशास्त्र,अर्थशास्त्र,साहित्य,कला,नीतिशास्त्र,धर्म,तत्वज्ञान,मानसशास्त्र या सर्व विद्याशाखांचा अभ्यास यामध्ये करावा लागतो.

प्रस्तुत प्रबंधाच्या प्रकरणांची क्रमशः मांडणी

प्रकरण पहिले : पर्यावरण ,परिसंस्था व पर्यावरणवादी समीक्षा : संकल्पना ,स्वरूप

प्रकरण दुसरे : कविता व मराठी कवितेची पूर्वपीठिका

प्रकरण तिसरे : स्वातंत्र्योत्तर मराठी कवितेची पर्यावरणवादी समीक्षा

प्रकरण चौथे : स्वातंत्र्योत्तर मराठी कविता आणि सांस्कृतिक पर्यावरण

प्रकरण पाचवे : पर्यावरण चळवळी,राजकीय भूमिका आणि मराठी कविता

प्रकरण सहावे : स्वातंत्र्योत्तर पर्यावरणीय स्त्रीवादी समीक्षा

प्रकरण सातवे : उपसंहार /निष्कर्ष

संदर्भग्रंथसूची परिशिष्ठ

प्रकरण पहिले

पर्यावरण ,परिसंस्था व पर्यावरणवादी समीक्षा : संकल्पना ,स्वरूप

PDF created with pdfFactory trial version www.pdffactory.com

१.१पर्यावरण:संज्ञा ,संकल्पना व स्वरूप १.२ परिसंस्था: संज्ञा ,संकल्पना व स्वरूप १.३ पर्यावरणवादी समीक्षा: संज्ञा ,संकल्पना व स्वरूप

साहित्य आणि निसर्ग यांचा परस्परसंबंध नेहमीच चर्चेचा विषय बनला आहे. कवितेतून येणाऱ्या निसर्गचित्रणाचे वर्णन खूप मोठया प्रमाणावर येताना दिसते. आधुनिक युगात निसर्ग व मानव यांच्यात परस्परसंबंध गुंतागुंतीचा व व्यामिश्र होताना दिसत आहे. भौतिक सुखाच्या हव्यासापोटी झाडांची होणारी कत्तल, जागतिक तापमानात होणारी वाढ, अचानकपणे येणारा अवकाळी पाऊस, भयावह दुष्काळ, महापूर जलप्रलय या गोष्टी आता नित्याच्याच होताना दिसत आहेत. प्रदुषणाची समस्या तर खूपच बिकट होताना दिसत आहे. या सर्वांचे चित्रण मराठी साहित्यातून कसकसे होत गेले याचा विचार पर्यावरणवादी समीक्षेमध्ये होणे गरजेचे आहे. निसर्ग व समाज यांच्या नात्याचे विश्लेषण, चिकित्सा पर्यावरणवादी समीक्षेमध्ये होणे गरजेचे आहे. पर्यावरणवादी समीक्षक पर्यावरण व निसर्ग यांचा समाजाशी असलेला संबंध व त्याचे चित्रण साहित्यामध्ये कसे व किती झाले आहे याचा अभ्यास करतात. साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून निसर्गाचे व एकुणच पर्यावरणाचे चित्रण किती प्रमाणात केले आहे याचा विचार पर्यावरणवादी समीक्षेमध्ये केला जातो.

या अनुषंगाने या प्रकरणात पर्यावरण ,विषम वाटपाची प्रक्रिया याचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण दुसरे

मराठी कवितेची वाटचाल/ पूर्वपीठिका

२.१प्राचीन मराठी कविता २.२ मध्ययुगीन मराठी कविता २.३अर्वाचीन मराठी कविता, निष्कर्ष

कविता म्हणजे काय? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचे काम निरंतरपणे चालू आहे.परंतु अंतिम अशी काव्याची व्याख्या अजून कोणीही केली नाही. कवितेचे असणे, दिसणे, संश्लेषण, विश्लेषण यातून काव्याचा शोध आणि वेध घेण्याचा प्रयत्न अनेक काव्यशास्त्रज्ञांनी केला आहे.

प्राचीन काळी असलेले मौखिक साहित्य म्हणजे लोकसाहित्यातील ‘लोकगीते‘ यामधून अभिव्यक्त झालेली पर्यावरणवादी मराठी कविता या प्रकरणात अभ्यासली जाईल.निसर्ग आणि मानव यांच्या संबंधाचा पर्यावरणीय शोध लोकगीतात कसा येतो हे तपासले जाईल. मराठीतील मध्ययुगीन कवितेला वैदिक आणि अवैदिक वैचारिक परंपरांचा आधार आहे. मध्ययुगीन मराठी संतकवींवर जे पर्यावरणीय प्रभाव आहेत ते काही निवडक उदाहरणांच्या सहाय्याने अधोरेखित केले

PDF created with pdfFactory trial version www.pdffactory.com

जातील. तसेच आधुनिक काळात पाश्चात्य विचारप्रणाली आणि महाराष्ट्रातील समताविचार पर्यावरणाकडे कसा पाहतो हे तपासले जाईल. महाराष्ट्राच्या विचारप्रवाहातील लोकहितवादी,विष्णूबुवा ब्रम्हचारी,महात्मा फुले यांच्या विचारातून पर्यावरणाचा विचार समकालिन कवितेतून कसा व्यक्त झाला आहे ते अभ्यासले जाईल. तसेच स्वातंत्र्यपुर्व काळातील कवितेतील पर्यावरणीय संबंध तपासले जातील.

प्रकरण तिसरे

स्वातंत्र्योत्तर मराठी कवितेची पर्यावरणवादी समीक्षा

३.१परिसंस्था ,निसर्ग व मानव (Ecology,Nature & Human) ३.२निसर्ग आणि साहित्य (Nature – Literature)३.३ भाषा ,साहित्य व पर्यावरण(Language ,literature & Enviornment) ३.४ दलित,विद्रोही कवितेतील निसर्ग(छंजनतम पद क्ंसपज च्वमउ) ३.५ पर्यावरण आणि अर्थशास्त्र (म्बवसवहल ंदक म्बवदवउपबे) ,निष्कर्ष

मराठी कवितेतून पर्यावरण,परिसंस्था आणि परिस्थितीकी याचे चित्रण मोठया प्रमाणावर आले आहे. भारतामध्ये पर्यावरण रक्षणासाठी अनेक चळवळी उभ्या राहिल्या. त्यापैकी अतिशय गाजलेली चळवळ म्हणजे ‘चिपको आंदोलन’ होय. हिंदीमध्ये ‘चिपको’या शब्दाचा अर्थ अलिंगन देणे हा होय. पर्यावरण रक्षणाचा संघर्षमय कार्यक्रम म्हणजे अशा प्रकारची आंदोलने होय. निसर्ग आणि साहित्य यांचे अगदी जवळचे नाते आहे.याचा मराठी कवितेवर झालेला परिणाम अभ्यासला जाईल.

दलित / विद्रोही कविता आणि पर्यावरण

विद्रोही कविता आणि पर्यावरण यांचा संबंध अगदी जवळचा आहे.दलित कवितेतील निसर्ग हा त्यांच्या व्यथा व वेदनांशी नाते सांगतो.उदयाला येणारा सूर्य त्याच्या वर्तमानकालिन आणि भविष्यकालीन अभ्युदयाची आशा म्हणून येतो. पेटणारा सूर्य, आग ओकणारा सूर्य त्याच्या नव्या संघर्षाची नांदी होऊन येतो. पर्यावरणातील प्रत्येक घटक दलित कवितेशी एकरुप होताना दिसतो. निसर्गावर मानवाने मिळवलेला विजय व त्यातून होणारा साधनसंपत्तीचा ऱ्हास यातून माणसाचे जगणे भयव्याकुळ करताना दिसत आहे. दलित कवींच्या कवितातूनही तशी दुखरी जाणीव व्यक्त होताना दिसते. नंतर आलेल्या लोकांनी इथला देश, माती, नदी,नाले, झाडे या सर्वावर आपले नाव कोरले आणि इथल्याच भूमीपूत्रानां दस्यू करुन सोडले.एकुणच दलित कवितेतून अनिमा,अनिमस सावली या आदिबंधात्मक प्रतिमा निसर्ग प्रतिमांच्या रुपातून कशा व का व्यक्त झाल्या त्याचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात केला जाणार आहे.

अर्थशास्त्र व पर्यावरणवाद

PDF created with pdfFactory trial version www.pdffactory.com

अर्थशास्त्र व पर्यावरण यांचा जवळचा संबंध आहे.निसर्गाशिवाय गरिबांजवळ गमावण्यासारख दुसरं असं काहीच नसतं. एकदा का ही नैसर्गिक मालमत्ता हडपली गेली की दारिद्र्यातून सुटका होत नाही निसर्ग नष्ट होणं म्हणजे भीषण दुष्टचक्राचा प्रवास सुरु होणं. स्वत:च्या स्वार्थासाठी निर्ढावलेल्या काही राजकारण्यामुळे व धनदांडग्यामुळे अवैध रेती खणण ,भूगर्भातील अनेक साठे अवैध मार्गाने उत्खनन करून पर्यावरणाचा ऱ्हास करण्याचे कॉन्ट्रॅक्ट मिळाले आहे. रासायनिक शेतीमध्ये डी.डी.टी.व बीएच.सीच्या अतिरिक्त वापराचे दुष्परिणाम जाणवू लागले .धान्य ,पाणी इतकेच नव्हे तर मातेच्या दुधातही क्लोरीन सापडू लागले त्यामुळे डी.डी.टी.,बीएच.सी वर बंदी आणली गेली.बदलत्या अर्थशास्त्राचे व पर्यावरणाचे चित्रण मराठी कवितेत कसे आले आहे याचा अभ्यास या प्रकरणात केला जाणार आहे.

प्रकरण चौथे

स्वातंत्र्योत्तर मराठी कविता आणि सांस्कृतिक पर्यावरण

४.१मानव व संस्कृती ४.२ साहित्य आणि संस्कृती ४.३निसर्ग आणि संस्कृती ४.४ सण व्रतवैकल्ये व निसर्ग

४.लोकसाहित्यातील निसर्ग ४.६ संस्कृती संकर व पर्यावरण व निष्कर्ष

साहित्य जीवनाची उच्चतम साधना आहे. साहित्यकार समाजाचे अंतर्मुखी व बहिर्मुखी विकास, रचनात्मक प्रवृत्ती यांचे सूक्ष्म दृष्टीने निरिक्षण करतो. सहजानुभूती भाषा व कल्पना यातून अक्षर साहित्यकृतींचे निर्माण करतो. साहित्य हे संस्कृतीचे महत्त्वपूर्ण अंग आहे. मानवी मनाचे मनोरंजन करणे हाच फक्त हेतू नाही तर मानवाच्या सर्वांगिण विकासाला साह्यभूत करणारे प्राणभूत तत्त्व म्हणूनही साहित्याचा निर्देश करावा लागेल. समकालिन साहित्याचे प्रतिबिंबच नव्हे तर ‘एक्सरे’ काढण्याचे कामही साहित्य करते.एक भाषा, एक क्षेत्र, एक जाती, एक काळ याचेच फक्त साहित्य नसते तर बहुभाषिक, सर्व जाती धर्म पंथ, सार्वकालिक अनुभवांचे सार म्हणजे भारतीय साहित्य होय.

स्वातंत्र्योत्तर मराठी कविता आणि सांस्कृतिक पर्यावरण

संस्कृती आणि निसर्ग यांचा अगदी जवळचा संबंध आहे. प्रकृती व संस्कृती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. प्रकृती आधी येते व त्यापाठोपाठ संस्कृती येते. प्रकृतीपासूनच संस्कृतीची अवधारणा होते.

‘मल्टिलिंग्वॅलिझम’ बहुभाषिकतेच्या जमान्यात मराठी कवितासुध्दा बदलाकडे वळलेली दिसते. संस्कृती आणि निसर्ग,मन आणि शरीर,मानवी आणि अमानवी अशा सर्वच क्षेत्रात बदलाचे वारे वाहत आहे. साहित्य हे सांस्कृतिक पर्यावरणामध्ये शक्तीशाली माध्यम किंवा प्रतिकात्मक

PDF created with pdfFactory trial version www.pdffactory.com

माध्यम म्हणून वर्णन करताना दिसते. निसर्ग हा मानवी मनाची प्रेरक शक्ती आहे. निसर्ग मानवी मनाला अवाहन करतो. अनेक निसर्ग कवितातून आपणास हे जाणवते. संस्कृतीचा सारांश आणि अभ्युदयाची आशा ही शेवटी निसर्गापर्यंतच येते.संस्कृती, नैसर्गिक संसाधने,शाश्वत सांस्कृतिक संबंध विकसित होण्यासाठी अशा अभ्यासाची गरज आहे.याचा विचार या प्रकरणात केला जाईल.

प्रकरण पाचवे

पर्यावरण चळवळी,राजकीय भूमिका आणि मराठी कविता

५.१ पर्यावरण चळवळी व राजकीय भूमिका ५.२ सेझ व पर्यावरण ५.३ समन्यायाची भूमिका ५.४ पर्यावरण कायदे व सर्वसामान्य जनता ,निष्कर्ष

पर्यावरण चळवळी,राजकीय भूमिका आणि मराठी कविता

पर्यावरण चळवळी आणि राजकीय भूमिका यांचा अगदी जवळचा संबंध आहे.साठोत्तरी काळात जात,वर्ग,लिंगभावाच्या विषमतेविरूध्द विद्रोह प्रकट करणाऱ्या अनेक चळवळी उदयास आल्या.समताधिष्ठित विचार घेतलेल्या चळवळी आपला विचारव्यूव्ह हस्तक्षेपासाठी वापरत होत्या. पाणीपंचायत,बळीराजा धरणप्रकल्प,सरदार सरोवर आंदोलन,सेझप्रश्नी उभे राहिलेले आंदोलन तसेच समाजवादी व डाव्या विचारांच्या चळवळींनी सहभाग घेतला आहे. या चळवळीमध्ये चढउतार होत गेलेले दिसतात याचा मराठी कवितेवर प्रभाव पडलेला आहे.यातून पर्यावरणाविषयी जी नवी कविता निर्माण झाली त्याचा अनुबंध तपासला जाईल. ग्रामीण आणि शहरी सीमारेषांना छेद देत कवी आपल्या कवितेतून अनुभव कसा अभिव्यक्त करतात ते तपासले जाईल.

समन्यायाची भूमिका :

बीना अगरवाल,रामचंद्र गुहा, मीना कंदस्वामी ,अरूधंती रॉय,इलिनॉर,गेल ऑम्वेट या प्रभृतींनी Gender Equality, Economical Equality,Social Descrimination, injustice याविषयी भाष्य केले आहे. निसर्गातील वस्तूंचे विषम वाटप ,जमीनींचे वाटप,अर्थसत्तेचे ,राजसत्तेचे विषम वाटप यावर त्यांनी भाष्य केले आहे.या आधारे कवितेतील हस्तक्षेपांची नोंद घेतली जाईल.

प्रकरण सहावे

स्वातंत्र्योत्तर पर्यावरणीय स्त्रीवादी समीक्षा (म्बवमिउपदपेउ)

६.१स्त्रीवादी साहित्य संकल्पना व स्वरूप ६.२ पर्यावरण व स्त्री ६.३ कवितेतून व्यक्त झालेला पर्यावणीय स्त्रीवाद, निष्कर्ष

पर्यावरणीय स्त्रीवादी चळवळ ¼Eco Feminism½ हे स्त्रीवाद आणि परिस्थितीकीशी संबध दर्शविते. ही संज्ञा फ्रेंच लेखिका(Francoise d Eaubonne) फ्रेंन्स्वॉज दि उबान या लेखिकेने १९८० मध्ये मांडली स्म थ्मउपदपेम वन सं उवतज या पुस्तकात ही संकल्पना मांडली गेली.

PDF created with pdfFactory trial version www.pdffactory.com

पर्यावरणीय स्त्रीवाद हा स्त्रीयांची पिळवणूक, छळवणूक व स्त्रियांवर अधिराज्य गाजवण्याची वृत्ती, पुरूषसत्ताक पध्दती यांचा संबंध पर्यावरणाशी जोडला गेला असे या समीक्षकाचे असे मत आहे. त्यांनी केलेल्या मांडणीचा भारतीय स्त्रीवाद आणि स्त्रीवादी पर्यावरणीय विचारांना आधार आहे. त्या आधारे स्त्रावादी पर्यावरणीय कवितेचा धांडोळा या ठिकाणी घेतला जाईल.

प्रकरण सातवे

उपसंहार /निष्कर्ष

मराठी कवितेची पर्यावरणवादी समीक्षा हा संशोधनविषय अभ्यासला असता आपणास काही निष्कर्ष हाती येतात. प्रस्तुत विषयाचा पूर्ण अभ्यास केल्यानंतर आणखी काही निष्कर्ष हाती येतील यात काही शंका नाही.

ए) मानव आणि निसर्ग यांचा जवळचा संबंध असलेला दिसतो.

एए) मराठी कवितेतून विषमतावादी पर्यावरण वाटपाचे व बदलत्या निसर्गाचे चित्रण मोठया प्रमाणावर येताना दिसते.

एएए) मराठी कवितेतून निसर्गप्रतिमांचे चित्रण वर्ग ,वंश,जात,लिंगभाव,धर्म यांच्या अनुषंगाने बदलताना दिसते.

एट) पर्यावरणीय स्त्रीवादी दृष्टिकोणातून मराठी कवितेचा विचार करता आपणास असे दिसते की मराठी कवितेतून निसर्गाचा

व स्त्रीप्रतिमांचा वापर करून मोठया प्रमाणावर कविता लिहिली गेली आहे.

ट) संस्कृती व पर्यावरण यांचाही जवळचा संबंध आहे. मराठी कवितेतून निसर्ग व संस्कृतीचे चित्रण मोठया प्रमाणावर

आले आहे. कवितेमध्ये निसर्ग महत्त्वाची भूमिका बजावताना दिसतो.

टए) आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक, भाषिक पर्यावरणाचा विचार करता निसर्ग या सर्वामध्ये केंद्रबिंदू असल्याचा

दिसतो. बदलत्या पर्यावरणीय समस्यांचे चित्रणही मराठी कवितेतून मोठया प्रमाणावर आले आहे.

टएए) मानवनिर्मित विषमतावादी पर्यावरणाचे वाटप व त्यांच्या शोषणाचे चित्रण मराठी कवितेतून मोठया प्रमाणावर आले आहे.

PDF created with pdfFactory trial version www.pdffactory.com

संदर्भ :कवितासंग्रह

१. कुसुमाग्रज ,'फुलराणी' ,कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे. १९७१.

२. कुसुमाग्रज ,'जीवनलहरी' ,कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे. १९७७.

३. ग्रेस, 'सांध्यपर्वातील वैष्णवी' ,पॉप्युलर प्रकाशन,मुंबई. २००१

४. ग्रेस, 'संध्याकाळच्या कविता' ,पॉप्युलर प्रकाशन,मुंबई. १९७२

५. महानोर ना.धों.,'वही' ,पॉप्युलर प्रकाशन,मुंबई. १९७१

६. महानोर ना.धों.,'पळसखेडची गाणी' ,पॉप्युलर प्रकाशन,मुंबई. १९०३

७. मेश्राम केशव , .,'विद्रोही कविता' ,कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे. २०१३

८. संपा.देसाई ,'बहिणाबाईंच्या कविता',शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.२०१२

संदर्भग्रंथसूची

१. कुलकर्णी गो.म.,'आधुनिक मराठी कविता काही रूपे :काही रंग' ,मेहता पब्लिशिंग हाऊस ,पुणे. १९९१

२. कुलकर्णी वा.ल. .,'मराठी कविता जुनी आणि नवी' ,पॉप्युलर प्रकाशन,मुंबई. १९०१

३. घारपुरे विठठल, ' पर्यावरणशास्त्र' ,पिंपळापुरे प्रकाशन,नागपूर.२०१४

४. चव्हाण रा.ना.,' भारतीय संस्कृती व तिची वाटचाल' ,रमेश चव्हाण प्रकाशक,पुणे.२०११

५. माने आशिष,बन्ने नीता,भूयेकर.,'पर्यावरण अभ्यास एक आधुनिक दृष्टिकोण' ,चैतन्य प्रकाशन,कोल्हापूर. २००५

६. मांडे प्रभाकर ,'लोकसाहित्याचे स्वरूप' ,गोदावरी प्रकाशन,औरंगाबाद. २००९

७. मोरवंचीकर रा.श्री., 'भारतीय जलसंस्कृती' ,सुमेरू प्रकाशन,मुंबई. २००६.

८. धोंगडे अश्विनी,' स्त्रीवादी समीक्षा स्वरूप व उपयोजन' , प्रकाशन,पुणे.२०१४

९. देऊळगावकर अतुल ,'बखर पर्यावरणाची ' ,मौज प्रकाशन,मुंबई. २००६

१०. ठकार निशिकांत, 'मराठी कविता:स्वरूप आणि विवेचन' ,स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन,पुणे .१९७७

११. ठाकरे वसंत ' पर्यावरण जाणीव विकास' ,साकेत प्रकाशन,पुणे.२०१२

१२. यादव केदारनाथ .,'पर्यावरण शिक्षा' ,अर्जुन पब्लिशिंग हाऊस,नई दिल्ली. २००६

१३. यादव स.ग,'.निसर्गकन्या बहिणाबाई ' ,प्रचार प्रकाशन ,कोल्हापूर.१९८२

१४. सानेगुरूजी ,'स्त्रीजीवन' ,इंद्रायणी साहित्य, पुणे.१९९८

१५. सिंह सुमन,'भारतीय साहित्यमें पर्यावरण रक्षण' ,रोशनी प्रकाशन,कानपूर. २०११

PDF created with pdfFactory trial version www.pdffactory.com

English Reference books

1. Cheryll Glotfelty, "Literary Studies an age of environmental crisis",
2. GaÙkad Greg "Ecocriticism" 2 park square Milton park, Abhingad, Oxfordshire. 2004
3. Deshpande H.V. "Research in Literature and language" ,Sukhda Prakashan,Patan.
4. Gifford, "Recent Critiques of Ecocriticism" _TeÙky New Formations, No. 64, Spring 2008
5. Dana Phillips , "The Truth of Ecology: Nature, Culture, and Literature in America"_ Oxford University Press, 2003
6. Internet
7. ASLE Journal.

मार्गदर्शकाची सही **संशोधकाची सही**

(प्रा.डॉ. एम.एम.जाधव) (प्रा.डॉ. भरत भिमराव जाधव)

PDF created with pdfFactory trial version www.pdffactory.com